सत्यमेव जयते

# पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय

मिलकॉर्नर,डॉ.बाबासाहेबआंबेडकररोड,छत्रपती संभाजीनगर
पीन -431001. दुरध्वनीक्रमांक0240-2240591
ई-मेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

दिनांक :-२८/०२/२०२५

जा.क्र.विशा-/आदेश/२०२५-छत्रपती संभाजीनगर,- 707

**-: भारतीय नागरीक सुरक्षा संहिता सन २०२३ चे कलम १६३ (१) (३) अन्वये मनाई आदेश :-**

**आदेश :-**

ज्या अर्थी माझ्या असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहेकी, पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात कर्मचारी चयन आयोग मुंबई यांचे मार्फत **Conduct of computer based Constable (GD) in central Armed Police Forces (CAPFs) and SSF, Rifleman (GD) in Assam Rifles, and Sepoy in Nacotics Cotrol Bureau Examination- २०२५** परीक्षांचे आयोजन दि.०४/०२/२०२५ ते दि.०७/०२/२०२५ ,दि.१०/०२/२०२५, दि.१३/०२/२०२५, दि.१७/०२/२०२५ ते दि.२०/०२/२०२५,दि.२१/०२/२०२५, दि.२५/०२/२०२५ **रोजी या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सकाळी ०८.०० ते २०.०० तीन सत्रात** खालील नमुद परीक्षा उपकेंद्रावर करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | परीक्षा केंद्राचे नांव | पो.स्टे |
|---|---|---|
| 1. | ION Digital Zone IDZ Chikalthana, E-५०, Beside CTR Manufacturing Industries Limited Near Chikalthana MIDC Police Station MIDC Industrial Area ChikalthanaChatrpatisambhajinagar, | एम.सिडको |

सदर परिक्षेचे काळात परीक्षा केंद्राच्या आजुबाजुस मोठया प्रमाणावर विद्यार्थ्यांचे पालक,मित्र व इतर हे परीक्षा केंद्रा जवळ जमा होवुन परीक्षा सुरळीत होणेस बाधा निर्माण करुन कर्तव्या वरील नेमलेले अधिकारी व अंमलदार यांच्यावर दबाव आणुन गर्दी करुन परीक्षार्थींना उपद्रव किंवा परीक्षा केंद्रावर शांतता भंग करण्याची दाट शक्यता आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

त्या अर्थी **मी प्रविण पवार , पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर** मला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता सन २०२३ चे कलम १६३(१)(३)अन्वये प्राप्त शक्ती नुसार वरील परीक्षा केंद्राचे परिसरात मी पुढील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

१. परीक्षा उपकेंद्रा पासुन १०० मीटर अंतरा पर्यंत बाहेरील आवारात परिक्षार्थी विद्यार्थी, परिक्षे संबंधी काम करणारे शासकीय अधिकारी व अंमलदार यांचे खेरीज करुन इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

२. परीक्षा उपकेंद्रापासून १०० मीटर अंतरापर्यंत बाहेरील आवारातील झेरॉक्स मशिन दुकाने तसेच एस.टी.डी.,आयएसडी, पीसी ओ बुथ,फॅक्स,डी.टी.पी.केंद्र ध्वनीक्षेपके परीक्षा काळात बंद ठेवण्यात यावीत.

३. माझ्या ह्या वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास त्या व्यक्ती विरुध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता सन २०२३ चे कलम २२३ अन्वये कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

वरील आदेशाची अंमल बजावणीसाठी आमचे अधिनस्थ सर्व परिमंडळ अधिकारी, सहायक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व इतर शाखांचे प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

वरील नमुद कर्मचारी चयन आयोग मुंबई मार्फत **Conduct of computer based Constable (GD) in central Armed Police Forces (CAPFs) and SSF,Rifleman (GD) in Assam Rifles, and Sepoy in Nacotics Cotrol Bureau Examination - २०२५ चे परीक्षा केंद्र व परिसरात फक्त परीक्षेचे दिवशी सकाळी ०७.०० वाजे पासून ते २०.०० वाजे पावेतो** सदरचा आदेश अंमलात राहील.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज **दि. 28 /०२/२०२५** रोजी छत्रपती संभाजीनगर येथे जाहीर करण्यात आला आहे.

COMMISSIONER OF POLICE CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

**प्रविण पवार (भा.पो.से )**
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

प्रति :- सर्व पो.स्टे./शाखा प्रभारी अधिकारी छत्रपती संभाजीनगर

प्रत :- १) जिल्हाधिकारी,छत्रपती संभाजीनगर
२) जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
३) उपायुक्त,गु.अ.वि.(गुप्तवार्ता) छत्रपती संभाजीनगर
४) केंद्र संचालक,आकाशवाणी , छत्रपती संभाजीनगर